मागणी वचन पत्र (लोन अकाऊंट क्रमांक……)

रुपये………/- दिनांक:…………

मागणीनुरूप, मी …….. युनिमोनीला पैसे देण्याचे वचन देतो/देते. युनिमोनी, कंपनी अधिनियम 1956 अंतर्गत नोंदणीकृत असून तिचे कार्यालय/ शाखा ……. येथे आहे. नमूद तारखेपासून ….. % प्रती वर्ष या दराने रुपये……………………… व्याजासह, मासिक/तिमाही/वार्षिक, विलंब झाल्यास, त्या शुल्काच्या आकारासह प्राप्त झाले.

Signature Across the Stamp

Revenue Stamp Rs.1/-

नाव आणि सही : …….

नियम आणि अटी

1. उपरोक्त नमूद कर्जदाराकडून मागणी वचन पत्र काढण्यात आले असून कंपनीने निश्चित केलेल्या दरानुसार कर्जावरील व्याज तसेच आकस्मिक आकारावर कर्ज देण्यात येईल, तसेच कर्जदारासोबत वेळोवेळी संपर्क साधला जाईल. या कारणास्तव 360 दिवसांचे वर्ष ग्राह्य धरण्यात आले आहे.

2. सदर कर्ज अ-कृषक कारणाकरिता उपलब्ध करून देण्यात आले आहे. दागिन्यांच्या मूल्याकरिता कंपनी 22 कॅरेट शुद्धतेची कसोटी ग्राह्य धरेल. ज्या दागिन्यांची शुद्धता कसोटी 22 कॅरेटहून कमी असेल, तिथे प्रती ग्राम गणना करण्यासाठी 22 कॅरेटनुसार दर परावर्तीत करण्यात येईल. कर्जाची रक्कम (एलटीव्ही) कोणत्याही तारण सोन्याच्या किंमतीच्या 75% पेक्षा जास्त नसेल. कर्जाची रक्कम, सोन्याचे वजन आणि प्रति ग्रॅम दराबाबत कंपनीचा निर्णय आरबीआयच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आणि अंतिम असेल. कर्जदाराने निवडलेल्या योजनेनुसार कर्जाची रक्कम वाटपाच्या तारखेपासून 3 ते 36 महिन्यांचा राहील. योजनेच्या विशिष्ट अटी व्यतिरिक्त, सामान्य अटी देखील कर्जदारास बंधनकारक असतील.

3. कर्जदार व्याज भरणा चुकवणारा आहे किंवा निश्चित तारखेला कर्जाची रक्कम भरण्यास टाळाटाळ करतो अशा स्वरुपाच्या संशयास्पद माहिती कंपनीला झाल्यास माहिती कंपनीला कर्जदाराविषयी काही संशयास्पद माहिती मिळाल्यास कंपनीद्वारे वाजवी नोटीस बजावून जारी करण्यात आलेल्या कर्जाची रकमेसह बाकी त्वरीत वसूल करण्याचे किंवा कर्ज कालावधी दरम्यान कोणत्याही क्षणी रि-पेमेंट/ पुनर्भरणा करण्याची सूचना देण्याचे अधिकार कंपनीला आहेत. जर उपलब्ध करून देण्यात आलेल्या कालावधीत कर्जदार बाकी/थकीत रक्कम परत करण्यास चुकला तर दागिन्यांची विक्री लिलावात करण्यात येईल.

4. कर्ज घेतेवेळी/ वाटपादरम्यान जारी करण्यात आलेली मूळ सुवर्ण कर्ज पावती कर्जाचा व्यवहार पूर्ण झाल्यानंतर, तो बंद करतेवेळी कर्जदाराने शाखेत जमा करणे अनिवार्य राहील. त्याशिवाय दागिन्यांचा ताबा मिळणार नाही. जर मूळ पावती गहाळ झाली असल्यास, कर्जदाराने कंपनीला त्वरित याविषयीची माहिती लिखित स्वरुपात कळवावी. केवळ कर्जदार स्वत: किंवा त्याने/तिने अधिकृत केलेल्या प्रतिनिधीने मूळ कर्ज पावती शाखेत सादर केल्यावर त्यांना दागिन्यांचा ताबा मिळू शकेल. त्याकरिता बाकी/थकीत रकमेचा भरणा पूर्ण करणे अनिवार्य राहील.

5. कंपनीकडून सर्व प्रकारच्या भरणा आणि प्राप्त रकमेसाठी केवळ सिस्टीमद्वारे जारी केलेल्या पावत्या उपलब्ध करून देण्यात येतात. कोणत्याही प्रकारच्या भरणा किंवा प्राप्त रकमेकरिता हाती तयार करण्यात आलेल्या पावत्या कंपनीकडून जारी केल्या जात नाहीत. शाखेबाहेर भरणा स्वीकारण्यात आल्यास, कर्जदाराच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर भरणा झाल्यासंबंधी पुष्टीचा एसएमएस पाठविला जाईल.

6. कर्जदाराच्या लोन खात्यासंबंधी (संभाव्यत:) सध्याच्या कोणत्याही नियम आणि तरतुदी, शुल्क किंवा व्याज दर अथवा नवीन शुल्क/आकारात बदल करण्याचे अधिकार कंपनीकडे आरक्षित आहेत. **याविषयीची माहिती कर्जदाराला (समजेल अशा भाषेत) आगाऊ स्वरुपात कर्जदाराने कंपनीकडून कर्ज घेतेवेळी नमूद केलेल्या मोबाईलवर किंवा ई-मेल आयडीवर एसएमएस अथवा ई-मेल पाठवून सूचित करण्यात येईल. ही माहिती कर्जदाराला कळविण्यात आल्यानंतर 7 दिवसांत त्याविषयीचे उत्तर किंवा विचारणा न झाल्यास ते कर्जदारापर्यंत पोहोचल्याचे, त्याला प्राप्त झाल्याचे तसेच त्याने स्वीकारले असे समजण्यात येईल.** कर्जदाराचा फोन क्रमांक/ ई-मेल/पत्ता याविषयी बदल असल्यास त्याने/ तिने तो बदल कंपनीला लेखी स्वरुपात सूचित करावा. त्याबद्दल कर्जदाराकडून कोणतीही हयगय झाल्यास, कंपनीकडून करण्यात आलेला संपर्क/ पत्र व्यवहार कर्जदारापर्यंत न पोहोचल्यास कंपनी जबाबदार राहणार नाही.

7. युनिमोनीद्वारे निश्चित केलेल्या व्याज दरानुसार व्याज आकारण्यात येईल. हे दर निश्चित करतेवेळी निधीची रक्कम, व्यवहार रक्कम जोखीम आणि किमान परताव्याची रक्कम हे घटक लक्षात घेतलेले आहेत. हे दर ठरविताना कर्जदारासंबंधी कोणत्याही

प्रकारचा भेदभाव करण्यात आलेला नाही. उलट प्रत्येक कर्जाच्या स्वरुपानुसार व्याज दर ठरविण्यात आला आहे. तसेच जोखमीची प्रतवारी करताना व्यापक दृष्टिकोन राखलेला आहे.

8. कर्जदार हा परताव्याच्या निश्चित करण्यात कालावधीत कर्जासोबत व्याजाची रक्कम परत करण्यास असमर्थ ठरल्यास त्याने/तिने (कर्जदाराने) कंपनीला दागिन्यांविषयी पुढील कारवाई करण्यास संमती दिली असे समजले जाईल. लिलावापूर्वी कंपनीकडून कर्जदाराला थकीत रकमेचा परतावा करण्यासंबंधीची रजिस्टर्ड नोटीस बजावण्यात येईल. तसेच नंतर ही नोटीस वृत्तपत्रात प्रकाशित करण्यात येईल. या संबंधीची सर्व प्रक्रिया कंपनीच्या अधिकृत अधिकाऱ्याद्वारे पूर्ण केली जाईल. लिलाव पूर्ण झाल्यानंतर जमा झालेली रक्कम आणि थकीत रकमेत फरक असल्यास, उर्वरीत बाकी रक्कम भरण्यासाठी कर्जदार संमत असेल असे इथे मानण्यात येते आहे. त्याबाबत कर्जदाराकडून कसलीही हयगय झाल्यास त्याच्या/तिच्याकडून उर्वरीत रक्कम वसूल करण्यासाठी कंपनीला कायदेशीर कारवाई करण्याचा अधिकार राहील. तसेच कर्जदार रजिस्टर्ड नोटीसीचा @ रु.50/- प्रती नोटीस खर्च उचलण्यासाठी जबाबदार राहील.

9. कंपनीने कर्जदाराकडून बाकी/थकीत रक्कमेची वसुली करण्याकरिता त्याला/तिला लिलावानंतर 7 दिवसांचा वेळ द्यावा. कंपनीने लिलावाची घोषणा सार्वजनिकरित्या किमान दोन वृत्तपत्रांत जाहिरात जारी करून द्यावी, त्यातील किमान एक वृत्तपत्र हे स्थानिक प्रादेशिक भाषेतील तर दुसरे राष्ट्रीय दैनिक असावे.

10. कर्ज घेतल्यानंतर कर्जदार कंपनीला बाकी/थकीत रकमेचा भरणा करत नाही तोवर दरवेळी कर्जाच्या 25% रक्कम राखण्याकरिता कर्जदार बांधील राहील. संपार्श्विक (को-लेटरल) मूल्याच्या मोजणीची किंमत संबंधित बाजार मूल्यावर आधारित असेल. मार्जिन/ संपार्श्विक मूल्य हे कंपनीकडून निश्चित करण्यात आलेल्या तारीख आणि वेळेला उपलब्ध करून देण्याचे कर्जदाराने मान्य केले आहे. तसेच मार्जिन/ संपार्श्विक मूल्याकरिता कंपनीकडून देण्यात आलेला कालावधी संपल्यानंतर कंपनी कोणताही भरणा स्वीकारण्यास नकार देऊ शकते.

11. परिच्छेद 8 मध्ये काही असले तरी, मार्जिन 20% पेक्षा खाली गेल्यास, अगदी मुद्तीपूर्वी देखील नजीकच्या भविष्यात कोणत्याही टप्प्यावर सार्वजनिक लिलावाद्वारे किंवा खासगी व्यवस्थेद्वारे दागिने विकण्याचा अधिकार कंपनी राखून ठेवते. लिलाव प्रक्रियेला सुरुवात करण्याआधी कंपनी कर्जदाराला हे मार्जिन पूर्ण करण्यासाठी 7 दिवसांचा अवधी देते आणि कर्जदार याला वाजवी मुदत समजून सहमती देतो.

12. तारण ठेवलेले दागिने ही नि:संशय कर्जदाराचीच मालमत्ता असते, इतर कोणत्याही व्यक्तीचा त्यावर अधिकार, रुची किंवा दावा असू शकत नाही आणि कर्जदाराला ती तारण ठेवण्याचा संपूर्ण अधिकार असतो. दागिन्यांच्या मालकीत कोणतीही त्रुटी आढळल्यास कर्जदाराला कंपनीला संपूर्ण हानी, किंमत आणि परिणामांची नुकसान भरपाई द्यावी लागते.

13. कोणतीही उधारी/ कर्ज सुविधा घेण्यासाठी कोणत्याही व्यक्तीला/ कंपन्यांना/ बँकांना/ आर्थिक संस्थेला तुमच्या सोन्याच्या दागिन्यांसकट (तारण ठेवलेली सेक्युरिटी) तुमच्या कर्जाचे हस्तांतरण, तारण, विक्री किंवा त्याचे सर्व हक्क ठरविण्याचा अधिकार कंपनी स्वत:कडे राखून ठेवते आणि कर्जदाराला याची माहिती असल्याने कोणत्याही आक्षेपाशिवाय त्याची संमती असते.

14. याद्वारे, कर्जदार या कर्जाची सुरक्षा म्हणून तारण ठेवण्यात आलेले मूळ सोन्याच्या दागिन्यांवरील पर्याय करारात प्रवेश करून कंपनीला किंमत जोखीम तारण ठेवण्यासाठी अधिकृत करतो आणि परस्पर कराराच्या संदर्भात संबंधित प्रमाणातील हस्याची भरपाई करण्यास सहमती दर्शवतो.

15. तारण ठेवलेल्या सर्व दागिन्यांचा कंपनीतर्फे विमा उतरवला जातो. असे असले तरी, काही गुणवत्तेमुळे किंवा दागिन्यांच्या घडणावळीमुळे जर काही नुकसान झाले तर त्यासाठी कंपनी जबाबदार असणार नाही. तरीही, कंपनीच्या किंवा त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे असे काही झाले तर मात्र कंपनी त्याची जबाबदारी स्वीकारते.

16. वास्तविकतेचा चुकीचा अर्थ लावून कर्ज मान्य करून घेतले गेले होते असे कंपनीचे मत झाल्यास, ज्या अवधीसाठी कर्जाला सहमती दर्शविण्यात आली होती ती मुदत संपण्यापूर्वीच कंपनी कर्जाच्या परतफेडीची मागणी करण्याचा अधिकार राखून ठेवते. अशी मागणी झाल्यास, कर्जदाराला संपूर्ण कर्ज आणि त्यावरील व्याज एकत्रितपणे परत करून आपले तारण ठेवलेले सोने सोडवून घ्यावे लागते.

17. कर्जदाराला हे मान्य करावे लागते की, कर्जाच्या तपशिलासह आणि थकबाकी आणि/ किंवा अटींचा भंग झाल्यास सर्व अटींसाठी ते बंधनकारक असेल; न्यायालयातर्फे किंवा इतर कोणत्याही उचित मंचातर्फे याचे निराकरण करण्याचा अधिकार युनिमनीने राखून ठेवला आहे.

18. कर्जदार पुढील बाबींशी संबंधित असलेला प्रशासन शुल्क, व्याज कर, सेवा कर, शुल्क, जीएसटी, कर आणि सर्व प्रकारच्या किंमती आणि खर्च यावरील खर्च, भरपाई आणि परतफेड करेल. (अ) कर्जाच्या अनुदानासाठी आणि परतफेडीसाठीचा अर्ज (ब) व्याजासकट कर्जाची वसुली आणि प्राप्ती (क) सुरक्षेची अमलबजावणी (ड) सर्व करांच्या थकबाकीची मंजुरी आणि तारण

(सेक्युरिटी) संदर्भातील तसेच या सेक्युरिटीचा विमा उतरविण्यासाठी सरकार तर्फे लावण्यात येणारे इतर कोणतेही शुल्क किंवा सरकारी आकारणी

19. सर्व थकीत खात्यांवरील मूळ थकबाकीवर चक्रवाढ व्याज आकारण्यात येईल. कोणत्याही वेळी दंडात्मक व्याज दरात बदल किंवा सुधारणा करण्याचा अधिकार कंपनी केवळ स्वत:च्याच अखत्यारीत राखून ठेवते.

20. कायदेशीर आणि/किंवा नियामक गरजांचे पालन करण्याच्या उद्देशाने कर्जदार कोणत्याही क्रेडीट सुविधेबाबतचा/ घेतलेल्या /घेणाऱ्या कर्जाचा, क्रेडीट ब्युरो, क्रेडीट रेटिंग एजन्सीज, बँका, आर्थिक संस्था, बँकएतर वित्तीय संस्था, डेटा बँक किंवा कोणतेही सरकारी किंवा नियामक प्राधिकरण/ संस्था/विभाग इ. संबंधित सर्व डेटा आणि/ किंवा सर्व/ कोणतीही माहिती उघड करण्याचा किंवा देण्याचा अधिकार कंपनीला प्रदान करतो.

21.सर्व प्रकारच्या संपर्काकरिता आवेदन पत्रात नमूद करण्यात आलेला पत्ता ग्राह्य धरावा, पत्त्यात एखादा बदल झाल्यास तो लिखित स्वरुपात सूचित करण्याची आणि कंपनीकडून त्यासंबंधीची पोचपावती देण्याची आवश्यकता आहे.

22. कंपनी कर्जदारांशी टपाल/कुरीयर/रजिस्टर ए.डी/ ई-मेल/दूरसंचार/एसएमएस/ यापैकी एक किंवा अधिक माध्यमांद्वारे संपर्क साधू शकते. या माध्यमांविषयी कोणतीही मर्यादा नाही. कंपनीकडून अशाप्रकारे संपर्क साधण्यात आला असता त्याला कर्जदाराने आव्हान देऊ नये. पावती विलंबाने प्राप्त झाली, पत्त्यातील बदलामुळे किंवा क्रमांक बदलल्याने पावती मिळाली नाही अथवा या स्वरुपाची कारणे आपण देणार नाही हे कर्जदाराने मान्य करावे.

23. कर्ज म्हणून प्राप्त झालेल्या निधीतून कोणत्याही स्वरुपातील सोने खरेदी जसे शुद्ध स्वरुपातील सोने, सोन्याची लगड, सोन्याचे दागिने, सोन्याची नाणी, गोल्ड एक्सचेंज ट्रेडेड फंड्स (ईटीएफ), गोल्ड फंडांचे समभाग यांची खरेदी करणार नसल्याची पुष्टी कर्जदाराने करावी.

24. व्याजाच्या रकमेचा भरणा करण्याविषयी स्मरण/आठवण करून देण्यासाठी, कंपनीच्या उत्पादनाविषयी करण्यात आलेले एसएमएस किंवा फोन याविषयी विचारणा/ संपर्क साधल्यास कर्जदाराने आक्षेप घेऊ नये.

25. कंपनी कर्जाच्या रकमेसाठी बँका/ एफएलएसकडून आर्थिक मदतीचा लाभ घेऊ शकते याची कर्जदाराला जाणीव असावी. कंपनीने स्पष्टपणे अधिकृत केल्याप्रमाणे, कर्जदार हा अशा बँक / एफएलएसकडून नोटीस मिळाल्यावर अशा बँकांना /एफएलएसना थेट देय रक्कम देण्यास सहमत आहे आणि अशा प्रकारच्या देयकामुळे कर्जदाराला योग्य आकार द्यावा लागेल.

26. कर्ज मंजूर करतेवेळी तारण ठेवण्यात आलेले दागिने हे 22 कॅरेट शुद्धतेचे आहेत, याची निश्चिती कंपनी करत नाही अथवा स्वीकारत नाही. कंपनी दागिन्यांच्या शुद्धतेची खात्री योग्य पद्धतीने स्वतंत्रपणे करू शकते. तारण म्हणून ठेवलेले दागिने कमी शुद्धतेचे वा बनावट असल्याचे कोणत्याही क्षणी कंपनीच्या नजरेस आल्यास कर्जदाराला सत्यस्थिती मान्य करणे बंधनकारक राहील. तसेच व्याजाच्या रकमेची परतफेड करण्यास तो जबाबदार राहील. कंपनीचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास योग्य ती कायदेशीर कारवाई करण्याचे अधिकार कंपनीला आहेत.

27. कर्ज दस्तावेज/ करारातील सर्व मजकूर कर्जदाराला समजणाऱ्या भाषेत असून आपण तो पूर्ण वाचून काढला आहे, याची खातरजमा कर्जदाराने कर्जाचा लाभ घेतेवेळी केलेली असावी.

28. कर्जाबाबत नियम आणि अटी नमूद केलेली प्रत आपल्याला प्राप्त झाली आहे, याची खात्री कर्जदाराने पटवावी.

29. या कर्जसंबंधी दस्तावेजातील नियम आणि अटींमध्ये सुधारणा करण्यासाठी युनिमोनीला अधिकार आहेत, हे मी इथे मान्य करतो/करते. मला हा व्यवहार योग्य वाटतो आणि याविषयीची सर्व माहिती मला युनिमोनीकडून सूचित करण्यात आली आहे.

30. नमूद करण्यात आलेल्या कालावधीपूर्वी कर्जदार हा कर्ज रकमेचा भरणा करू इच्छित असल्यास त्याच्याकडून बाकी राहिलेल्या मुद्दलाच्या 0.25% एवढे मुदतपूर्व शुल्क आकारले जाईल.

31.क्रेडीट इन्फॉर्मेशन ब्युरो (इंडिया) लिमिटेड आणि/ किंवा आरबीआय किंवा इतर कायदेशीर संस्थांतर्फे मान्यताप्राप्त इतर कोणत्याही एजन्सीकडे कर्जदाराने घेतलेल्या कर्जाविषयीची माहिती किंवा डेटा उघड करण्याचे अधिकार कंपनीला तो देतो. या एजन्सीज त्यांना हवी असेल त्या प्रकारे ही माहिती उपयोगात आणू शकतात किंवा सामाईक करू शकतात, याची जाणीव कर्जदाराला आहे.

32. या कर्जामुळे कोणताही वाद निर्माण झाल्यास तो लवाद व समेट अधिनियम, 1996 च्या तरतुदीनुसार कंपनीने नियुक्त केलेल्या लवादाकडे सोपविण्यात येईल. लवाद कार्यवाही एर्नाकुलम येथे होईल. हा व्यवहार एर्नाकुलम न्यायालयाच्या विशेष क्षेत्राच्या अधीन असेल.

**33. मुख्य कालावधी पूर्ण झालेल्या प्रकरणांत कर्ज पूर्ण फेडले जाईपर्यंत दर साल 11.8% इतके दंडात्मक व्याज आकारण्यात येईल.**

**34. मुदतीची तारीख उलटल्यावर दररोज सर्व कर्ज चुकवेगिरी करणाऱ्या (डिफॉल्टर) ग्राहकांना दरसाल 3.6% दंडात्मक व्याज लागू होईल.**

35. कर्जाच्या अटी आणि शर्ती मी नीट वाचून समजून घेतल्या आहेत आणि त्याची प्रत मला देण्यात आली आहे. हे दागिने माझे असल्याचे मी इथे जाहीर करतो. दागिन्यांवर खडे जडलेले आहेत. जर त्यांचे काही बाजार मूल्य नसेल. मान्य केलेल्या अटींनुसार मी व्याजासकट कर्जाची परतफेड करण्याचे मान्य करतो. वरील सर्व अटी आणि शर्ती मला स्पष्ट केल्या गेल्या आहेत आणि मी त्या स्वीकारल्या आहेत.

36.कर्जासंबंधी सुयोग्य पद्धत (प्रॅक्टीस कोड) कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे: www.unimoni.in.

ठिकाण : ग्राहकाची स्वाक्षरी : .........

दिनांक :